MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१२९ | शुक्रवार दि.२४ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -129 | FRIDAY DT.24 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |


## खाजगी डॉक्टरने घातला केज उपजिल्हा रूग्णालयात गोंधळ

प्रतिनिधी। केज

एका मद्यपी रूग्णासोबत गेलेल्या खाजगी डॉक्टरने केज उपजिल्हा रूग्णालयात गोंधळ घालून डॉक्टरांसोबत हुज्जत घातल्याचा प्रकार बुधवारी (दि.२२) सायंकाळी घडला. यानंतर पोलिसांनी खाजगी डॉक्टरविरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. सुरज सुभाष मुंडे असे गोंधळ घालणार्या खाजगी डॉक्टरचे नाव आहे. तो एका जखमी असलेल्या मद्यपी रूग्णासोबत केज उपजिल्हा रूग्णालयात गेला होता. यावेळी सचिन ढाकणे नामक व्यक्ती सोबत होती. त्याठिकाणी त्याने मी न्यूरोसर्जन असल्याची बतावणी केली. रूग्णालयात कार्यरत वैद्यकीय अधिकार्यांच्या तपासणीवेळी हस्तक्षेप केला. यावेळी सुरक्षारक्षकांनी बाहेर थांबण्यास सांगताच वैद्यकीय अधिकार्यांसह सुरक्षारक्षक, कर्मचार्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. कर्मचार्यांच्या अंगावर जाऊन धमक्या देत मारहाण करण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचार्यांनी केज पोलिसात तक्रार दिली. त्यानंतर केजचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी डॉ.सुरज मुंडे यास ठाण्यात बोलावून प्रतिबंधात्मक कारवाई केली. त्याने दिलगिरी व्यक्त केल्याने प्रकरण थांबले. यादरम्यान पोलिसांनी 'प्रसाद' दिल्याने डॉक्टरला चांगलीच अद्दल घडली आहे.

# वाल्मिक कराडच्या नादाला लागून बीड पोलीस झाले नायकाचे खलनायक!



- आ. सुरेश धस यांचा संताप, भ्रष्ट पोलिसांवर कारवाईची मागणी
- वाल्मिक कराडशी संबंध असलेल्या पीआय बल्लाळ यांच्या ऑडिओ क्लिपमुळे खळबळ
- मुन्नी बदनाम हो गई म्हणत धस यांनी पोलिसांवर केला हल्लाबोल!
- महादेव मुंडे हत्या प्रकरणाचा तपास एलसीबीकडे देण्याची मागणी
- वाल्मिक कराडच्या वर्चस्वामुळे बीड पोलीस प्रशासनावर संशयाचा काळा डाग

बीड प्रतिनिधी: बीड जिल्ह्यात पोलिसांची प्रतिमा मलीन होण्यामागे भ्रष्टाचार आणि गुन्हेगारांशी असलेल्या संबंधांमुळे प्रकरणे चिघळत चालली आहेत. यामध्ये विशेषतः परळीतील कुख्यात वाल्मिक कराडचे नाव समोर येत आहे. कराडशी संबंधित एका ऑडिओ क्लिपमुळे बीड पोलिसांच्या कामकाजावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

या क्लिपमध्ये बीड शहर पोलीस स्टेशनचे पीआय शीतलकुमार बल्लाळ वाल्मिक कराडसाठी आरोपीला वाचवण्याच्या सूचना देताना ऐकू येत आहेत. ही क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर पोलीस दलातील भ्रष्टाचार आणि गुन्हेगारांशी असलेले संबंध उघडकीस आले आहेत.

भाजप नेते व आष्टीचे आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणावर ताशेरे ओढले. मीडियाशी बोलताना ते म्हणाले, बल्लाळ सारखे अधिकारी पोलीस दलाला बदनाम करत आहेत. मुन्नी बदनाम हो गई तशी बीड पोलिसांची अवस्था झाली आहे. त्यांनी यावेळी पोलिसांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

वाल्मिक कराड प्रकरणात उघड झालेले प्रकार:

१. ऑडिओ क्लिप: बल्लाळ यांनी आरोपीसाठी विनवण्या केल्याचे पुरावे.

२. भ्रष्टाचार: गुन्हेगारांना पाठबळ देणाऱ्या पोलिसांची नावे उघडकीस.

३. गुन्हेगारी वाढ: कराडसारख्या माफियांमुळे जिल्ह्यात शिस्तभंग.

### महादेव मुंडे हत्या प्रकरण: तपास एलसीबीकडे द्या

महादेव मुंडे हत्या प्रकरणात अजूनही मारेकरी सापडलेले नाहीत. १५ महिन्यांपासून प्रकरण प्रलंबित आहे. यावर आ. धस यांनी एसपी नवनीत कावत यांची भेट घेऊन प्रकरणाचा तपास लवकरात लवकर करण्याची मागणी केली. त्यांनी या प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे (एलसीबी) वर्ग करण्याची सूचना दिली आहे.

### आ. धस म्हणाले:

महादेव मुंडे यांच्या हत्येचा तपास योग्यरीत्या होऊन आरोपींना शिक्षा झाली पाहिजे. वाल्मिक कराड आणि त्याच्या टोळक्याच्या संबंधांमुळेच जिल्ह्यात गुन्हेगारी वाढली आहे. पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी त्यांना पाठबळ दिले, हे दुर्दैवी आहे.

### वाल्मिक कराडचे पोलिसांशी संबंध: नायकाचे खलनायक

ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्यानंतर बीड जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. यामध्ये बल्लाळ यांनी कराडसाठी आरोपीला वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे स्पष्ट होत आहे. या प्रकरणामुळे जिल्ह्यातील गुन्हेगारीशी संबंधित पोलिसांची भूमिका संशयास्पद ठरत आहे.




आमदार धस यांचा इशारा:बीड पोलीस दलात फेरबदल होण्याची गरज आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांना थोडक्यात सोडणे चुकीचे ठरेल. आता दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर जनता प्रश्न विचारल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा धस यांनी दिला आहे.बीड जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी वरिष्ठ अधिकारी कसे पावले उचलतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## भंडाऱ्यात आयुध निर्माण कंपनीत भीषण स्फोट, ८ ठार

भंडारा – भंडारा येथील लष्कराच्या आयुध निर्माण कारखान्यात शुक्रवारी १०.३० च्या सुमारास भीषण स्फोट झाला. या घटनेत आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला असून, ७ जण गंभीर जखमी झालेत. भंडाऱ्याचे जिल्हाधिकारी संजय कोलते यांनी सांगितले आहे की, स्फोटामुळे कारखान्याचे छत कोसळले. त्यात १३ ते १४ जण अडकल्याची भीती आहे. घटनास्थळी युद्धपातळीवर बचाव व मदतकार्य राबवले जात आहे.

हा स्फोट एवढा भीषण होता की, त्याचा आवाज ५ किलोमीटर अंतरापर्यंत ऐकण्यात आला. स्फोटानंतर पोलाद व दगडाचे तुकडे दुरवरपर्यंत फेकल्या गेले. अधिकृत सूत्रांच्या माहितीनुसार, हा स्फोट जवाहरनगर स्थित फॅक्ट्रीच्या एलटीपी (लाँग टर्म प्लॅनिंग) सेक्शनमध्ये झाला.

## बिंदुसरा नदीपात्रात अतिक्रमित बांधकाम,कच–याचे ढीग आता सर्रास वृक्षतोड ; नगरपालिकेचे दुर्लक्ष :– डॉ.गणेश ढवळे

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीमध्ये मागील काही वर्षापासून नदीपात्रामध्ये भुमाफियांचे अतिक्रमणाचे प्रमाण वाढलेले असुन याला नगरपरिषद व जिल्हा प्रशासनाचा छुपा पाठिंबा दिसुन येत आहे. नदीपात्रामध्ये कचऱ्यांचे भर टाकून त्यावर प्लॉटिंग करणे ,रस्ते बनवणे , बांधकाम करणे असे प्रकार सर्रास आढळून येत आहेत .आता यातच काही मंडळींनी नदीपात्रातील महाकाय वृक्षांची कत्तल करण्यास सुरुवात केली असून याकडे नगर प्रशासन , जिल्हा प्रशासन आणि वनविभाग सोयीस्करपणे डोळेझाक करत आर्थिक हितसंबंध जोपासत दुर्लक्ष करताना दिसते. संबंधित अतिक्रमण आणि बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर , रामनाथ खोड, शेख युनुस ,शिवशर्मा शेलार, मुबीन शेख,बीड जिल्हाध्यक्ष आप,अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष (इंटक) रामधन जमाले यांनी उपमुख्याधिकारी ,नगरपरिषद बीड सम्राट कदम यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



बीड शहरातील बिंदुसरा नदी पात्रातील ब्लड झोन , ग्रीन झोन, रेड झोन ,येल्लो झोन असे विविध झोन नगरपालिका डायरीतून गायब झाले की काय ? अशी शंका निर्माण होत आहे. मोंढा रस्त्यालगत जुन्या हिंदू स्मशानभूमीच्या पाठीमागे बिंदुसरा नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत असून अनाधिकृत बांधकाम करण्यात येत आहे. हे करत असताना शेकडो वर्ष जुने महाकाय वृक्षांची राजरोसपणे कत्तल केली जात आहे .प्रथम नदीपात्रात भर टाकायची त्या ठिकाणी जागा तयार करायची. त्या ठिकाणी छोटेसे धार्मिक स्थळ उभे राहायचे. मग त्यावर प्लॉटिंग टाकून नदीपात्रातील जमिन गिळंकृत करायची असा काहीसा प्रकार दिसून येत आहे. याबद्दल सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी नगरपालिका तसेच जिल्हा प्रशासनाकडे लेखी तक्रारी तसेच आंदोलनाद्वारे कारवाईचे मागणी केलेली आहे. यातच आता वृक्षतोडीमध्ये शेकडो वर्ष जुने तिन चिंचांचे व पाच लिंबांचे महाकाय नदीपात्रातील वृक्ष तोडण्यात आलेले आहेत. भूमाफियांना हे वृक्ष अडचण ठरत असावेत यामुळे हे वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. या सर्व प्रकाराकडे नगरपालिका प्रशासन तसेच जिल्हा प्रशासन आणि वनविभाग दुर्लक्ष करत आहे. यामुळे अतिक्रमणधारकांचे मनोधैर्य वाढत असून निसर्गावर, नदीवर घाला घालून बिंदुसरा नदीपात्र गिळंकृत करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. असे प्रकार वाढत राहिल्यास १९८९ सारखी पूरस्थिती येऊन हजारो नागरिकांचे प्राण जाऊ शकतात याला जबाबदार कोण असेल? त्यामुळे प्रशासनाने नदीचे सीमारेषा आखून देणे. भुमाफियांनी केलेले अतिक्रमण काढून टाकणे. ज्यांनी वृक्षतोड केली आहे त्यांच्यावर कठोर करावी शासन स्तरावरून करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तसा पर्यावरण प्रेमी यांनी केले असून भविष्यात मोठे जनआंदोलन उभारण्याचा इशारा दिला आहे.

## माजलगाव चे अतिरिक्त ऊस प्रश्नावर रूपामाता गूळ पावडरचा हातभार - मा.सरपंच उद्धव(काका) ताकट

माजलगाव ( सुनिल थोरात)

माजलगाव तालुक्यात दोन नद्यामुळे माजलगाव धरण व गोदावरी वरचे उच्चपातळी बंधारे यामुळे पाणी भरपूर आहे आणि माजलगाव तालुक्यातील जमिनीही सुपीक आहेत परंतु पूर्वी मोजकेच साखर कारखाने असल्या कारणाने जास्त ऊस लागण करून तो गाळपास देणे हे प्रश्न अतिशय भेडसावत होते. शेतकरी शेजारील जिल्ह्यात म्हणजे धाराशिव,लातूर इकडे उसासाठी खेटे मारायचे. कर्मचाऱ्याला ऊस तोडणी दाराला ड्रायव्हरला हातापाया पडून वेगवेगळ्या पार्ट्या देऊन आपली ऊस तोडून नेऊन घालायचे आणि पुन्हा तितक्या लांब पैशासाठी खेटे मारून बिले घ्यावयाची अशी परिस्थिती होती.

सन २०२०-२१ मध्ये आपल्याकडे अतिरिक्त ऊस होता त्या काळात आपल्या भागातून रूपामाता कारखान्याने आपल्या भागातून ऊस नेला होता आणि त्याही वेळी त्यांनी उसाचे चेक आपले भागात स्वतः आणून पोच केले.

आम्ही स्वतः रूपामाता उद्योग समूहाचे चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड साहेब यांची प्रत्यक्ष भेट घेऊन आपले भागात कारखाना काढणे संदर्भात त्यांना विनंती केली आणि त्यांनी आमच्या विनंतीस मान देऊन त्याच वर्षी इकडे कारखाना काढण्याची प्रक्रिया सुरू केली आणि प्रत्यक्षात २०२०- २०२१ मध्ये त्यांनी १८००० टन उसाचे गाळप करून आपले भागात २५०० रुपये प्रति टन भाव दिला त्याचबरोबर त्यांच्याच भागातील अजून एक यशवंत नावाने आपल्या भागात एक कारखाना आला व आपल्या भागातील श्री खुरपे यांनी सुद्धा एक दुसरा गुळ पावडरचा कारखाना त्यांच्याच प्रेरणेने काढला आणि या तीनही गुळ पावडर कारखान्यामुळे आपल्या भागातील अतिरिक्त ऊस गाळपासाठी पर्याय तयार झाला.

रूपामाता कारखान्याने गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये एक लाख १५ हजार टन गाळप करून आपल्या भागात उच्चांकी म्हणजे २८०० रुपये प्रति टन ऊस दर देऊन आपल्या भागात स्वयंपूर्णता आणण्याचा प्रयत्न केला. आज आपल्या भागातील जवळजवळ सव्वाशे दीडशे लोक कारखान्यात प्रत्यक्ष काम करत असून त्या लोकांना एक चांगला रोजगार निर्माण झालेला आहे तर त्या नोकरीमुळे कित्येक मुलांचे लग्न जमत आहेत. आपल्या



भागातून बाहेरगावी ऊस तोडणी साठी जाणारे लेबर वाहतूकदार यांनाही या कारखान्यामुळे घरीच स्वतःचे घराजवळच काम मिळाले आहे त्यामुळे तेही लोक आपल्या भागात सुखी समाधानी नांदत आहेत. चालू हंगामात ही या कारखान्याने आज अखेर ६५००० टन गाळप करून शेतकऱ्यांना २७०० प्रति टनाप्रमाणे दहा डिसेंबर पर्यंतचे ऊस बिल शेतकऱ्याच्या खात्यावरती जमा केलेले आहे परंतु एक बाहेरचा कारखानदार यामुळे आपले येथील काही अपप्रवृत्तीचे लोक त्यांच्या बाबतीमध्ये अपप्रचार करून लोकात संभ्रम निर्माण करत आहेत. तरी लोकांनी या संभ्रमाला बळी न पडता कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे आणि आपला भविष्यातील अतिरिक्त उसाचा प्रश्न याच कारखान्यामुळे सुटणार आहे

# दिपक माने यांच्या वतीने माळेवाडी येथे विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व कॉम्प्युटरचे वाटप

माजलगाव । सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील माळेवाडी येथील जि.प.शाळेत दिपक माने यांच्या वतीने स्कूल बॅग व कॉम्प्युटर चे वाटप करण्यात आले.तालुक्यातील वाघोरा येथील अल्प भूधारक असणारे व पोटाची खळगी भागवण्यासाठी आई-वडिलांसह गाव सोडून पुणे येथे स्थित असणारे तसेच उच्च शिक्षण प्राप्त केलेले दीपक माने हे बालपणापासून चाणाक्ष बुद्धी, जिद्द आणि शिक्षणाच्या जोरावर उच्चशिक्षित झाले. बालवयापासून त्यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा प्रभाव असल्याने आपणही समाजाचे काहीतरी देणे आहोत. आणि आपणही आपल्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी काहीतरी




केले पाहिजे हाच मनोदय उराशी बाळगत त्यांनी २६ जानेवारी निमित्त सुलतानपूर ( माळेवाडी ), गोविंदवाडी, किट्टी आडगाव या भागातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांसाठी १५०० स्कूल बॅग व कॉम्प्युटर सेट चे वाटप करण्याचा संकल्प केला आहे.

मूळचे वाघोरा येथे रहिवासी असणारे दीपक माने यांना कुठलीही राजकीय अथवा सामाजिक पार्श्वभूमी नसून आपण समाजाचे काहीतरी देणे आहोत. आपणही समाजासाठी काहीतरी केले पाहिजे या भावनेतून आपणही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी आहोत. समाजातील गोरगरीब होतकरू विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून काहीतरी केले पाहिजे या अनुषंगाने जातीपातीच्या पलीकडे जाऊन सर्वच समाजातील गोरगरीब व अति दुर्बललागतील दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे तसेच कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये. हाच मनोदय उराशी बाळगत २३ जानेवारी २०२५ जि प प्राथमिक शाळा सुलतानपुर येथे स्कूल बॅग व कॉम्प्युटर चे वाटप केले आहे देशाचे भवितव्य घडवूया, विद्यार्थ्यांना आधार देऊ या संकल्पनेतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुलतानपुर ( माळेवाडी ) येथे वाटप करून नंतर गोविंद वाडी, किट्टी आडगाव येथील शाळेतील १५०० विद्यार्थ्यांना स्कूल बॅग तसेच गरजु विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर सेटचे वाटप दीपक मधुकर माने यांच्या वतीने करण्यात येणार आहे. यामुळे परिसरात आनंद व्यक्त केला जात आहे.या प्रसंगी माजी आमदार मोहन काका सोळंके,कृ.ऊ.बा.सभापती जयदत्त नरवडे, माजी सभापती नितिन नाईकनवरे, दयानंद स्वामी,कचरू खळगे, मधुकर माने,बंडू लोखंडे,संजय नरवडे,माजी सरपंच सुभाष लोखंडे, संजय लोखंडे, सदाशिव लोखंडे,बाबासाहेब लोखंडे, धर्मा मोरे, शुभम माने,लव तांबे, अक्षय थोरात,आकाश माने,राजेभाऊ थोरात व पत्रकार बांधव यांची उपस्थिती होती.

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा शाळेची विविध गड किल्ल्यावर भेट देत शैक्षणिक सहल संपन्न

सुमेध करडे ।तलवाडा

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तलवाडा शाळेची शैक्षणिक सहल दि.१५ जानेवारी ते १९ जानेवारी पर्यंतचा सहलीचा शैक्षणिक प्रवास अत्यंत उत्साहामध्ये व आनंदात संपन्न झाली.... यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज व थोर पुरुषांचे कार्य प्रत्यक्षात अनुभवासाठी सहली मध्ये गड, किल्ले,अध्यात्मिक मंदिर, निसर्गरम्य परिसर व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सत्याग्रह केलेले ठिकाण अशा अनेक सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिक वारसा असलेल्या ठिकाणी भेटी देऊन विद्यार्थ्यांना या सर्व ठिकाणाची उपयुक्त अशी माहिती शिक्षकाकडून देण्यात आली...या सहलीमध्ये शिवनेरी किल्ला, लेण्याद्री, ओझर गणपती मंदिर, पालीचे गणपती मंदिर, गरम पाण्याचे झरे, बिर्ला मंदिर, काशीद बीच, जंजिरा किल्ला ,महाडचे चवदार तळे , प्रतापगड, महाबळेश्वर, वाईचे गणपती मंदिर, प्रति




बालाजी पुणे, दत्त मंदिर नारायणपूर व जेजुरीचे दर्शन अशा अनेक स्थळांचा या सहलीमध्ये समावेश करण्यात आला होता....या सहली मध्ये संस्थेचे प्रशासकीय अधिकारी व प्राचार्य श्री गोरकर सर,पर्यवेक्षक श्री हटकर सर, सहल प्रमुख श्री सोलाट सर ,बस प्रमुख श्री येवले सर, श्री पवार एन.आर.सर ,श्री लाड सर ,श्री जाधव सर ,श्री डी के पवार सर ,श्री सगळे सर, श्री ढोबळे सर ,कारके मॅडम ,श्री डोंगरे सर, श्री मुदळ सर ,श्री लाड डी सर या सर्व शिक्षकांना शैक्षणिक सहल चांगल्या रित्या संपन्न केली..

## समर्थांच्या पादुकांची आज भव्य मिरवणूक , सहभागी होण्याचे आवाहन

बीड (प्रतिनिधी)

श्री समर्थ रामदास स्वामी संस्थान सज्जनगड येथील पादुका प्रचार व दौराभिक्षा फेरी, जन्मस्थान जांब समर्थ येथून अंबानगरी मार्गे सज्जनगड जाताना बीड शहरात आज शुक्रवार २५ जानेवारीपासून सुरुवात होणार आहे. ही भिक्षा फेरी व प्रचार दौरा ३१ जानेवारी दुपारी बारापर्यंत चालणार आहे. आज शुक्रवार २४ जानेवारी रोजी सहयोग नगर मधील सर्वेश्वर गणेश मंदिरापासून सुभाष रोड मार्गे थोरले पाटांगणापर्यंत पादुकांची आज भव्य मिरवणूक



काढण्यात येणार आहे, यावेळी ह. भ. प. महादेव महाराज चाकरवाडीकर, श्री भूषण स्वामी अध्यक्ष सज्जनगड संस्थान , समर्थांच्या घराण्यातील अकरावे वंशज,मान्यवर, लोकप्रतिनिधीची, नागरिक बंधू भगिनीचीं विविध ठिकाणी स्वागताला उपस्थिती असणार आहे.

दिनांक २५ ते ३१ जानेवारी सकाळी आठ ते दुपारी बारा यावेळी शहराच्या विविध भागात भिक्षा फेरीचा कार्यक्रम होईल. पाटांगणावर मुक्कामी असलेल्या पादुका ठिकाणी दररोज सकाळी काकड आरती, अभिषेक व आरती आठ ते बारा पर्यंत भिक्षा फेरी, सायंकाळी सांप्रदायिक नित्य उपासना , किर्तन सेवा, शेजारती होईल. सर्व भाविक भक्तांनी, समर्थ सेवेकर, नागरिक बंधू-भगिनींनी सहभागी होण्याचे आवाहन संपादक दिलीपराव खिस्ती विनायक महाराज पाटांगणकर ,प्रा.डॉ. दीपक देशमुख, समर्थ भक्त कृष्णा महाराज रामदासी यांनी केले आहे.

## बीड जिल्ह्यात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख , वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यामध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या मार्गदर्शनाखाली विवीध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली.

शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी त्यांना अभिवादन केले.बीड जिल्हा रुग्णालय येथे सर्व रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार भगिनींना साडी वाटप,प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजना खाली आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना अल्पउपहार देण्यात आला.युवासेना माजलगाव तालुका युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजना खाली माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.धारूर तालुकाप्रमुख बाबा सराफ यांच्या आयोजना खाली धारूर येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आले.युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजनाखाली वडवणी तालुका मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही,पेन वाटप करण्यात आले.शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांच्या आयोनाखाली बीड शहरातील भगवान विद्यालय शेजारी ध्येयपूर्ती गुरुकुल येथे २० तारखेपासून सुरू असलेल्या वकृत्व स्पर्धा, रनिंग स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,अशा अनेक स्पर्धांचे बक्षीस वितरण करून सर्व विद्यार्थ्यांना जेवण देण्यात आले.

याबरोबरच बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणी समाज उपयोगी कार्यक्रम घेत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती सर्व बीड जिल्ह्यातील शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिकांनी मोठ्या उत्साहात पार पाडली..!!

## आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाची दोन दिवशीय कार्यशाळा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आयोजित दोन दिवशीय व्यवसाय व समुपदेशन कार्यशाळा येथीलखोलेश्वर महाविद्यालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्य शाळेचे उदघाटन संपन्न झाले. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभागाचे संचालक डॉ.सुधाकर शेंडगे होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.दिपक फुलारी होते. सुधाकर शेंडगे म्हणाले की,यश मिळण्यासाठी जिद्द चिकाटी विश्वास असला पाहिजे आजीवन शिक्षण विभागाने कौशल्य शिक्षण याची सुरुवात केली असून छोटे छोटे अभ्यासक्रम निर्माण केले आहेत. त्यातून शिक्षण घेऊन




खोलेश्वर महाविद्यालयाचा उपक्रम

विद्यार्थी स्वतःला सिद्ध करून रोजगार मिळवतात रोज नवीन गोष्टी आत्मसात करायला शिका त्यामुळे तुमचे भविष्य उज्वल होईल असे या प्रसंगी त्यांनी सांगितले .

अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ फुलारी म्हणाले की, शिक्षण शाळा - महाविद्यालयातील शिक्षणावर अवलंबून न राहता बाहेरील कौशल्य आधारित शिक्षण घेऊन विद्यार्थ्यांनी आपल्या पायावर उभा राहिले पाहिजे.

नंतर पहिल्या सत्रात प्रमुख मार्गदर्शक प्रा.सतीश हिवरेकर यांनी 'नवीन शैक्षणिक धोरण ' या विषयी बोलताना सांगितले की,भारताचे शैक्षणिक धोरण उच्च प्रतीचे होते. त्यात प्रामुख्याने तक्षशिला व नालंदा विद्यापीठ मधून हे शिक्षण दिले जात होते पुढे बहिस्थ शिक्षणास सुरुवात झाली. काळ बदलला आवश्यक गरजा बदलल्या त्यानुसार हे शिक्षण बदलावे लागले नवीन शैक्षणिक धोरणाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य सांगुन शैक्षणिक धोरणातील असलेल्या बदलानुसार मातृभाषेतून शिक्षण असले पाहिजे असे ते म्हणाले.

उपप्राचार्य बिभीषण फड यांनी अध्यक्षीय समारोप केला. सत्र दुसरे- प्रमुख मार्गदर्शक म्हणून मराठी विभागाचे प्रा.गौतम गायकवाड हे लेखन व संभाषण कौशल्य या विषयावर बोलताना म्हणाले की,विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्यासाठी लेखन आणि संभाषण कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे.म्हणून कौशल्य शिक्षण घेऊन आपण आपल्या पायावर उभे राहू शकता. ज्ञानाच्या बरोबर कौशल्य शिक्षण घेणे आवश्यक आहे. सत्राचे अध्यक्ष वाणिज्य विभाग प्रमुख सुभाष पटेकर यांनी अध्यक्षीय समारोप केला.या कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रा.रमण झरीकर यांनी मानले . या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य डॉ . कुंबेफळकर, बिभीषण फड तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## न.प. बीड मधील भ्रष्टाचार संबंधी दि. २५ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर अमरण उपोषण करणार- पठाण

बीड (प्रतिनिधी)

नगर परिषद बीड मधील मुख्याधिकारी व सबंधीत कर्मचाऱ्यांनी संगणमत करुन बांधकाम, गुंठेवारी, नौकर भरती, कर आकारणी मध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असून त्यांचे विरुध्द कार्यवाही होत नसल्यामुळे दि.२५ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया वीड समोर अमरण उपोषण करणार असल्याचे समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी आपल्या पत्राकात म्हणटले.



या बाबत अधिक माहिती अशी की, नगर परिषद बीड मध्ये तात्कालीन मुख्याधिकारी उत्कृर्ष सोपानराव गुट्टे, सेवानिवृत्त निर्मळ जैन नगर रचनाकार, सय्यद सलीम सय्यद याकुब यांनो संगणमत करुन गुंठेवारी, लेआऊट, बांधकाम परवानगी बांधकाम पूर्णतेचा दाखला देवुन लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला असल्या बाबतचे पुरावे शासन, प्रशासनाकडे अर्जासोबत सादर करुन ही प्रशासन मधले लोक त्यांना पाटीशी घालत आहे. न.प. बीड निलंबीत उपअभियंता अखील फारुकी यांचे मुलं व भाऊचे नावे असलेले बलभीम कॉलेज समोरील अनाधिकृत बांधकाम, बलभीम चौक बीड येथील वावु लाढा यांचे अनाधिकृत बांधकाम, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहा समोरील अनाधिकृत बांधकाम, सर्वे नं. १०८. ११९ तरफ गिराम बीड मधील रद्द झालेले लेआऊट मधील अनाधिकृत बांधकाम थांबविणे व पी.टी. आर वरील नावाची नोंद रद्द करणे.

तसेच न.प.बीड मधील सेवानिवृत्त कनिष्ठ नगर रचना सय्यद सलीम सय्यद याकुब यांचे कारंजा टॉवर जवळील कॉम्प्लेक्स विरुध्द पुरावे देवुनही शासन व प्रशासन कार्यवाही करीत नाही कार्यरत असलेले मुख्याधिकारी निता अंधारे यांनाही संबंधीता विरुध्द कार्यवाही करण्यात यावी म्हणून अनेकवेळा निवेदन देवून ही त्यांनी कार्यवाही न करता स्वतः ही भ्रष्टाचाराचे मार्ग स्विकारुन भ्रष्टाचार करण्यान्यांना पाठीशी घालण्याचे काम केले आहे व अनारधिकृत बांधकामाना धारकांना कर आकरणी करुन साथ दिली नगर परिषद बीड मधील नियमबाहय्य नौकर भरती बाबत दि.०९/०४/२०१८ रोजी जिल्हा भ्रष्टाचार समिती मध्ये अर्ज दाखल करुन ही आज पर्यंत कार्यवाही करण्यात आली नाही. मा. जिल्हाधिकारी साहेब बीड यांनी संबंधीत भ्रष्ट अधिकारी कर्मचाऱ्या विरुध्द कार्यवाही आज पर्यंत झाली नाही. दि.२५ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालया समोर अमरण उपोषण करणार असल्याचे निवेदन दि.०७/०१/२०२५ रोजी दिल असल्याचे पत्रकात समाजसेवक मुकरमजान पठाण यांनी म्हणटले आहे.

# बीड जिल्ह्यातील संतांचे समाज सुधारणेत मोठे योगदान - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी)

संपूर्ण अध्यात्मिक क्षेत्रात बीड जिल्ह्यातील संतांची मोठी परंपरा आहे. शेकडो वर्षांपासून त्यांनी समाज सुधारणेत मोठे योगदान दिले आहे. अंजनवती येथील संत तुकाविप्र हे प्रसिद्धीपासून दूर असले तरी त्यांचे कार्य खूप मोठे आहे. आजही विप्र घराण्यातील सदस्य आणि लाखो भाविक राज्यातील विविध भागात असलेल्या संस्थानवर भक्ती भावाने सेवा करत आहेत. एवढी मोठी परंपरा असणारा बीड जिल्हा आहे याचाच अभिमान वाटतो असे गौरवोद्गार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

बीड तालुक्यातील अंजनवती येथील संत तुकाविप्र यांच्या २३३ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि संस्थानच्या वतीने उभारण्यात आलेल्या भोजन कक्षाचे उदघाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विलास बडगे, अर्जुन पाटील, रविंद्र विप्र, माणिक विप्र, कैलास येडे, अर्जुन येडे, विलास येडे, सुनील येडे, दत्ता काळे, वसु चव्हाण, कैलास काटवटे यांच्यासह विप्र घराण्यातील सदस्य उपस्थित होते. प्रारंभी संत तुकाविप्र आणि वीणा पूजन करण्यात आले, त्यानंतर भोजन कक्षाचे उदघाटन करण्यात आले, यावेळी विप्र कुटुंबाच्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, बालाघाट वर २३३ वर्षांपूर्वी संत तुकाराम यांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या या अध्यात्मिक क्षेत्रामध्ये खूप मोठे



योगदान आहे वारकरी संप्रदायात कीर्तन परंपरा बंकट स्वामींच्या माध्यमातून सुरू झाली समाज सुधारणेसाठी संतांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रबोधन केले अनेक संप्रदाय असले तरीही बीड जिल्ह्याला लाभलेली ही संत परंपरा संपूर्ण जाती धर्माला बरोबर घेऊन समाज सुधारणेच्या हेतूने सप्ताहाच्या रूपाने खेडोपाडी पोहोचली समाजाच्या प्रत्येक अंगाने विकास करण्यासाठी आपल्या बीड जिल्ह्यातील संतांचे मोठे योगदान आहे संत तुकाविप्र यांच्या या संस्थांचा प्रचार आणि प्रसार फारसा पुढे आला नसला तरी या संस्थांचा विकास होणे महत्त्वाचा होता म्हणूनच आपण यासाठी प्रस्ताव दाखल करून दीड कोटी रुपयाचा निधी मंजूर करून आणला यामध्ये सभामंडप भक्तनिवास आणि इतर विकासाची कामे होणार आहेत विकासाची प्रक्रिया या भागात निरंतर सुरूच आहे जवळपास १५ विविध विकास कामे या ठिकाणी झाले आहेत. सिमेंट रस्ते, कब्रस्तान संरक्षण भिंती, डांबरे रस्ते, पांदण रस्ते खडीकरण, कोल्हापुरी बंधारे आणि अंजनवती येथील ३३ केव्ही सब स्टेशन अशी विविध कामे आपण आपल्या कार्यकाळात करू शकलो. या संस्थांच्या विकासासाठी विप्र परिवाराने आग्रह केला होता त्यामुळे जाणीवपूर्वक प्रयत्न करून हा निधी मंजूर करून घेतला हा परिवार मनोभावे सेवा करत आहे त्यांना गावचे लोकही खूप मदत करत आहेत या भागात शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी हायस्कूल देखील आपल्या संस्थेने उभारलेले आहे अंजनवती येथील हे संस्थान धार्मिक कार्य पुढे नेत

# नवमतदारांनो जागरूक व्हा : मतदानाचे महत्व जाणा : २५ जानेवारी ; राष्ट्रीय मतदार दिवस

२५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनाच्या औचित्याने १८ वर्ष पूर्ण केलेल्या नवतरुण मतदारांनी आपआपला रहिवास असलेल्या ठिकाणी बी एल ओ मार्फत मतदार यादीत नाव समाविष्ट करुन भविष्यातील येणाऱ्या सर्व निवडणूकामध्ये आपला मतदानाचा अधिकार बजवावा व देशाची लोकशाही बळकट करावी असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे .

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण भारतभर २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो . २५ जानेवारी हा १५ वा राष्ट्रीय मतदार दिवस संपूर्ण भारतभर साजरा होत आहे . या दिवशी मतदान केंद्रस्तरावर शहर , गाव पातळीवर बीड तहसिल कार्यालयाच्या वतीने नियुक्त केलेले मतदान केंद्रस्तरीय अधिकारी अर्थात बी एल ओ या नावाने प्रसिध्द असलेले कर्मचारी यांचे मार्फत ग्राम व शहर पातळीवर वेगवेगळे उपक्रम राबविले जातात . या उपक्रमाच्या माध्यमातून नवमतदार व मतदारांमध्ये मतदार यादीत नाव असणे किती महत्वाचे आहे , मतदान करणे किती महत्वाचे आहे या बाबत जनजागृती केली जाते . मतदार केंद्रस्तरावर नवमतदार , शालेय विद्यार्थी व मतदार यांच्या विविध स्पर्धा , पथनाटय , प्रभातफेरी , गीतगायन , नाटक असे प्रोत्साहनपर व मतदार व मतदानाविषयी जाणीव निर्मिती होईल असे उपक्रम राबविले जातात . रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून मतदार यादीत नाव असणे म्हणजे आपण मतदार होणे व मतदार झाल्यावर मतदान करणे हे आपले कर्तव्य तर आहेच व आपला हक्कही आहे , असा संदेश देण्याचा प्रयत्न केला जातो . मतदान करणे ही काळाची गरज आहे हा देखील संदेश रांगोळी स्पर्धेच्या माध्यमातून दिला जातो .

तसेच वक्तृत्वस्पर्धा, गीतगायन या स्पर्धेचा माध्यमातून मतदार यादीत नाव समाविष्ट होण्यासाठी कोणकोणते कागद पत्र लागतात , वयाची अट , रहिवाशी पुरावा या सर्व बाबीची माहिती



करुन देण्यात येते . शाळास्तरावर विद्यार्थ्यांची रॅली काढण्यात येते व मतदार जनजागृतीचा घोषणा देण्यात येतात .

निवडणूक आयोग व मतदार यामधील महत्वाचा दुवा म्हणजे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी ( बी एल ओ ) आहे . बी एल ओ वर्षभर निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व तहसिल कार्यालयाच्या आदेशान्वये काम करत असतो . मतदार यादीचे शुध्दीकरण करणे म्हणजे जे मतदार मयत झालेत , कायम स्थलांतरीत झाले त्यांची पडताळणी करुन त्यांचे नाव त्या भागातुन कमी करणे . त्यासाठी फार्म नं. ७ भरणे , ज्या व्यक्तीला ज्या ज्या वेळी लागु होईल त्या त्या अर्हता दिनांकाला १८ वर्ष पुर्ण होतील , त्या नवमतदाराचे नाव मतदार यादीत लावणेसाठी त्याचेकडून सर्व कागदपत्र घेणे. सर्व कागदपत्र म्हणजे वयाचा पुरावा , रहिवाशी पुरावा व कुटुंबामधील कुणी मतदार असेल तर त्याचा पुरावा जमा करणे . त्यांचे फार्म नं. ६ भरणे व त्याचे मतदार यादीत नाव समाविष्ट करणे . काही मतदारांचा नावात , पत्यात , फोटोत , दुरुस्ती असेल तर ती दुरुस्ती करणे , अशी विविधकामे बी एल ओ करतात . ग्राम पातळी , शहर पातळीवर कुणी मतदारांचा नावाबद्दल दुबार नाव , चुकीचे नाव या बाबत हरकत घेतली तर ती बी एल ओ यांचे माध्यमातून चौकशी करुन त्याच्यावर निर्णय घेतला जातो . तसेच मतदार यादी प्रसिध्द करण्याचे महत्वाचे काम बी एल ओ मार्फत केले जाते .निवडणूकीच्या वेळेस मतदार वोटर स्लिप बी एल ओ मार्फत मतदरांना वाटप केल्या जातात . अशी वर्षभर महत्वाची कामे बी एल ओच्या माध्यमातून पूर्ण करुन घेतली जातात . तसे पहिले तर सर्वच बी एल ओ काम करतात , पण त्यातल्या त्यात जे उल्लेखनिय काम करतात अश्या बी एल ओ यांचा तहसीलस्तरावर , जिल्हास्तरावर यथोचित सन्मान या दिवशी करण्यात येतो . राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी तालुका स्तरावर जे बी एल ओ उल्लेखनिय कार्य करतात, त्यांची यादी करुन पाठविली जाते , अशांचा तालुकास्तरावर तसेच जिल्हास्तरावर भव्य असा कार्यक्रम घेऊन जिल्हाधिकारी यांचे हस्ते , सम्मनाचिन्ह , प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात येतो . तसेच जे नवमतदार आहेत त्यांना मान्यवरांच्याहस्ते मतदार ओळख पत्र वाटप करण्यात येते . या सदर कार्यक्रमात मुक्त व नि:पक्षपाती पणे जात व धर्म याला बळी न पडता मतदार करु या बाबत प्रतिज्ञा / शपथ घेतली जाते .

बीड जिल्हयातील ११ तालुक्यापैकी एक म्हणजे बीड तालुका . बीड शहराचे पुर्वीचे नाव चंपावतीनगर आहे . बीड तालुक्यातील चिंचोली नेकनुर भागास मांजरथडी असेही म्हणतात . तालुक्याचे हवामान सर्वसाधारणत: उष्ण् व कोरडे आहे . उन्हाळा मोठा व कडक असतो तर हिवाळा कमी कालावधीचा असून तो सौम्य असतो . जून ते सप्टेंबर कालावधीमध्ये पाऊस पडतो . परंतु पावसाचे प्रमाण कमी असून त्यामध्ये अनियमियतता असते . बिंदुसरा नदी बीड तालुक्यातील डोंगराळ परिसरात उगम पावते . बिंदुसरा नदी बीड शहरातुन वाहत जाते . ज्वारी हे पीक मुख्य आहे . तसेच दळणवळणासाठी बीड मधुन सोलापुर राष्ट्रीय महामार्ग जातो . बीड तालुक्यामध्ये खजाना बावडी , कपीलधार नावाचा धबधबा तसेच कनकालेश्वर मंदीर , दीपमाळा , शहेंशाहवली दर्गा या सारखी धार्मिक स्थळे देखील आहेत .

बीड तालुक्याअंतर्गत येणारे एकुण मतदार केंद्र – ४५७ असून त्याची विभागणी खालीलप्रमाणे आहे :

| | | |
|---|---|---|
| बीड विधानसभेतील मतदान केंद्र | – | ३४५ |
| गेवराई विधानसभेतील मतदार केंद्र | – | ७१ |
| केज विधानसभेतील मतदार केंद्र | – | ४१ |

अश्या प्रकारे बीड तालुक्यातील एकुण मतदार केंद्रे ४५७ आहेत . बीड विधानसभेचा विचार केल्यास बीड तालुक्यातील ३४५ मतदान केंद्र शिरुर तालुक्यातील ५१ मतदान केंद्र असे एकुण ३९६ मतदान केंद्र बीड विधानसभा क्षेत्रात येतात .

बीड विधानसभा मतदार संघातील एकुण मतदार – ३८६६२४ असून त्यापैकी पुरुष मतदार – २०३९९४ , स्त्री मतदार – १८२६२१ व तृतीयपंथी मतदार ०९ आहेत .

भारत निवडणुक आयोगाने मतदारांसाठी वेगवेगळया हेल्पलाईन , वेबसाईट सुरु केलेल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे आहेत. मतदारासाठी वोटर हेल्पलाईन , ई सी आय डॉट जि ओ व्ही डॉट इन , अपंग मतदरासाठी सक्षम प , बीएलओसाठी बी एल ओ प आहे .

भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी रोजी करण्यात आलेली आहे . हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा करण्यात येतो . भारताची लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी तरुण मतदारांनी वयाची १८ वर्ष पुर्ण झाली की मतदार यादीत नाव नोंदवून राजकीय प्रक्रीयेत हिरारीने भाग घेऊन नवीन पिढीने देशाचे आधार स्तंभ व्हावे हिच अपेक्षा .

चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसिलदार बीड

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात ज्ञानदीप विद्यालयाचा तृतीय क्रमांक

धारूर / प्रतिनिधि

गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यांचे हस्ते राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाला निवडी बद्दल ज्ञानदीप विद्यालयाचे विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन त्याचे कौतुक केले व वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगण्यसाठी विविध विज्ञान प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेणे गरजेचे असे प्रतीपादन गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे यानी केले.

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र किल्ले धारूर येथे गटशिक्षण अधिकारी मनोज कोल्हे यांनी प्रत्यक्ष भेट देत राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या निवडीबद्दल विद्यालयाचे भरभरून असे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. यावेळी राज्यस्तरावर विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झालेल्या विद्यार्थीनी वैष्णवी नेताजी सोळंके व अनुष्का अंकुश चव्हाण तसेच त्यांचे मार्गदर्शक शिक्षिका मनीषा तिडके व मार्गदर्शक शिक्षक श संजय साठे पालक नेताजी सोळंके यांना पुष्पगुच्छ व शाल



देऊन सर्वांचे कौतुक व अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यक्रम अध्यक्ष म्हणून धारूर गटशिक्षणाधिकारी मनोज कोल्हे, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख सय्यद हकीम, सय्यद शाकेर, पालक नेताजी सोळंके विद्यालयाचे मुख्याध्यापक शेख. एस. एस. उपस्थित होते. यावेळी विज्ञान विषयाच्या मार्गदर्शक शिक्षिका मनीषा तिडके यांनी विद्यार्थ्यांना विज्ञान प्रदर्शनाचे महत्त्व त्याचे फायदे व सहभाग का नोंदवावा याचे मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री मुंजाराम निरडे सर यांनी केले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी व शिक्षकवृंद उपस्थित होते

## बीडनजीक होणारा उड्डाणपूल ३ पदरीऐवजी ६ पदरी होणार

### डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनंतर पालकमंत्री ना.अजितदादा पवार, धनंजय मुंडेंकडून मोठा बदल

प्रतिनिधी। बीड

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोडसह महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल उभारण्याच्या निविदा विभागाने काढल्या होत्या. परंतु त्यामध्ये आता मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. याबाबत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी विभागाला निर्देश दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून या कामी पाठपुरावा सुरु केला आहे.

सोलापूर-छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गाच्या बीडच्या वळण रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होतात. येथील महालक्ष्मी चौकात उड्डाणपूल तयार केला तर हे अपघात टाळता येतील, असा प्रस्ताव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भुपृष्ठ वाहतूक



मंत्रालयाकडे गतवर्षी दिला होता. यात महालक्ष्मी चौकातील उड्डाणपुलासोबतच स्लिप रोडची देखील मागणी करण्यात आली होती. या पत्रांचा संदर्भ देत ना.नितीन गडकरी यांच्या आदेशावरून भुपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने तांत्रिक शक्यता तपासून अहवाल सादर केला. त्यांनतर इतर प्रक्रिया पूर्ण होऊन निविदाही निघाल्या होत्या. परंतु हे उड्डाणपुलाचे काम ३ पदरी होणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले. त्यातही अनेक त्रुटी होत्या. त्यामुळे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्या कानावर हा प्रकार घातला. त्यांच्या माध्यमातून अजितदादा पवार यांच्यासमोर हा प्रश्न मांडला. त्यानंतर सुचनेची दखल घेऊन त्यांनी संबंधित विभागांच्या अधिकार्यांना योग्य त्या सर्व सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता उड्डाणपुलाच्या कामात मोठा बदल होणार असून ३ पदरीऐवजी ६ पदरी उड्डाणपूल दोन्ही बाजूने उभारण्यात येणार आहे. तसेच, प्रस्तावित तीन ठिकाणीच स्लीप रोड होणार आहे. या नवीन बदलाच्या अनुषंगाने शासनाकडून कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन नवा बदल

भविष्यातील वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मांडलेली सूचना कौतुकास्पद आहे. या सुचनेची दखल घेऊन राज्य शासनाने योग्य ती पाऊले उचलण्यास सुरुवात देखील केली आहे. या कामाबद्दल अजितदादा पवार, धनंजय मुंडे



## महिला बालविकास कार्यालयातील लिपीक पाचशे रूपयाची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

बीड । प्रतिनिधी

बीड : बालसंगोपन योजनेचा लाभ घेण्यासाठी तक्रारदाराकडून पाचशे रूपयांची लाच घेताना जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयातील लिपीकाला गुरूवारी (दि.२३) रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने जेरबंद केले आहे. दिलीप क्रिस्टय्या महलंके असे या कनिष्ठ लिपीकाचे नाव आहे. तक्रारदाराच्या बहिणीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना मध्ये एकलपालक म्हणून शासकीय अनुदान मिळवण्याकरिता त्यांचे कागदपत्राची फाईल करून जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालय जमा करण्याकरिता गेले होते. यावेळी दिलीप क्रिस्टय्या महलंके यांनी पाचशे रूपयांची लाघ मागितली. याबाबत तक्रारीनंतर लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला आणि गुरूवारी (दि.२३) जिल्हा महिला व बालविकास विभागाच्या कार्यालयातच पंचासक्षम पाचशे रुपयांची लाच घेताना दिलीप महालंके लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले आहे. त्यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक युनुस शेख, हनुमान गोरे, भारत गारदे, अविनाश गवळी, गणेश मेहेत्रे यांनी केली आहे.

## जयवंती नदीवरील अवैधरित्या होणाऱ्या बांधकामाकडे नगरपालिकेचे जाणूनबुजून दुर्लक्ष

### अंबाजोगाई नगरपरिषदेच्या बांधकाम व स्वच्छता विभागाची चौकशी करा – दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापुसाहेब उदारे यांची मागणी २६ जानेवारी रोजी आमरण उपोषणाचा इशारा

अंबाजोगाई / प्रतिनिधी

जयवंती नदीवरील अवैधरित्या होणाऱ्या बांधकामाकडे नगरपालिकेचे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहे. तसेच अंबाजोगाई नगरपरिषदेच्या बांधकाम व स्वच्छता विभागाची चौकशी करा अशी मागणी दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापुसाहेब उदारे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, अंबाजोगाई यांना सोमवारी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापुसाहेब उदारे यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई यांना सोमवार, दिनांक २० जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई शहरातील जयवंती नदीवर अनेक धनदांडग्या लोकांनी अतिक्रमणे करून नदीचे पात्र छोटे केलेले आहे. तसेच हॉटेल शितलच्या शेजारी अवैधरित्या जयवंती नदीच्या पात्रात सिमेंट कॉंक्रीटचे पक्के बांधकाम सुरू असुन नगरपालिका त्याकडे जाणुनबुजुन दुर्लक्ष करीत आहे. या संदर्भात मी दिनांक ०४/१२/२०२४ व उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांचे पत्र दिनांक ०६.१२.२०२४ दिले आहे. सद्या अंबाजोगाई शहरामध्ये रस्त्याच्या दुतर्फा अवैधरित्या केलेले अतिक्रमण काढणे सुरू आहे. त्यामध्ये अनेक गोरगरीब लोक हे बेघर झालेले आहेत व आज त्यांचे संसार उदध्वस्त झाले असून दुसरीकडे राहण्यासाठीचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. तरी सुध्दा नगर परिषद प्रशासनाने जयवंती नदीमध्ये धनदांडग्यांचे अतिक्रमण अद्यापपर्यंत काढलेले नसुन त्याकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहेत. वेळोवेळी निवेदने दिलेली असुन एक वर्षांपासुन सदर बांधकामाबाबत व नगर परिषदेच्या विविध विभागाच्या काळ्याबाजाराबाबत माहिती अधिकारात माहिती मागितली असता ती अद्याप ही देण्यात आलेली नाही. तसेच न.प. बांधकाम विभागात कोट्यावधींचा भ्रष्टाचार झालेला असुन त्या विभागाकडुन अद्याप माहिती मिळत नाही. तसेच स्वच्छता विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असुन त्याची सुध्दा माहिती निवेदकास दिलेली नाही. स्वच्छता विभागाचे टेंडर मागील अनेक वर्षांपासुन एकाच व्यक्तीला देण्यात येत असुन न.प.चे लाखो रूपयांचा घोटाळा केलेला आहे. तसेच घंटागाडी, त्याच डिझेल, त्याचे रिपेअरींग या माध्यमातुन सुध्दा कमीशन मधुन भ्रष्टाचार केलेला आहे. तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांचे टेंडर ५-६ वर्षांपासून त्याच्या मर्जीतील माणसाला देवून स्वतःच चालवून फक्त लायसन हे दुसऱ्याचे नांवाचे घेतो. तसेच स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांचे त्यांच्याशी आर्थिक संबंध आहेत. तसेच सदरील कंत्राटदार हे कर्मचाऱ्यांना कोणतीच सुविधा उपलब्ध करुन देत नाही. त्यामळे श्री.वेडे स्वच्छता निरीक्षक यास तात्काळ सदर पदावरून कमी करण्यात यावे तसेच श्री.अनंत वेडे हे मागील १५ वर्षांपासुन नगरपरिषद अबाजोगाई येथे स्वच्छता निरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी त्या माध्यमातून कोट्यावधीचा भ्रष्टाचार केलेला आहे. तसेच त्यांनी कचरा व्यवस्थापन मध्ये गांडुळ खत प्रोजेक्ट मध्ये सुध्दा सफाई कर्मचाऱ्यांसाठी लागणारी किट व सामग्री कधीच लेबरला दिलेली नाही. त्यात सुध्दा काळाबाजार केलेला आहे. सफाईसाठी लागणारे साहित्य. नालीवर टाकण्यासाठी ब्लिचिंग पावडर, किटनाशक फवारणी. व धूर फवारणी केलेला नसुन त्याचे फक्त बील उचलण्यात आलेले आहे. पाणी पुरवठा विभागामध्ये बोगस केलेल्या कामाचे व माहित्याचे बीले सादर करून लाखो रूपयांचा भ्रष्टाचार गेल्या कित्येक वर्षांपासुन सुरू आहे. तसेच एकच गुत्तेदारास वारंवार कामे दिली जात आहेत. या सर्व प्रकरातुन मोठ्या प्रमाणात श्री.अनंत वेडे यांनी भ्रष्टाचार केलेले आहे. व त्यांच्याकडे रियल स्टेटमध्ये जमीन, प्लॉट वेगवेगळे कोट्यावधीचे उद्योग वेगवेगळ्या शहरामध्ये आपल्या नातेवाईकांच्या नांवावर चालू आहे. या सर्वांची ऍन्टी करप्शन ब्युरो, मुंबई मार्फत चौकशी करण्यात यावी. स्वच्छता निरीक्षक श्री.अनंत वेडे यांना तात्काळ निलंबीत करण्यात यावे. मुकुंदराज सभागृह, विलासराव देशमुख सभागृह व गार्डनचे सुशोभिकरण या कामासाठी बोगस बिले दाखल करून लाखो रूपये उचलुन शासनाची दिशाभुल केलेली आहे. तसेच लाईट विभागात सुध्दा बोगस कामे दाखवुन व साहित्य खरेदी दाखवुन लाखो रूपयाचा भ्रष्टाचार केलेला आहे. या सर्व प्रकरणात न.प.यांचेकडे निवेदने देवुन सुध्दा अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तसेच सदर प्रकरणी काय कार्यवाही केली याबाबत सुध्दा कोणताही पत्रव्यवहार करीत नाहीत. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, आपण सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून आपण केलेल्या कार्यवाहीबाबत निवेदकास लेखी कळविण्यात यावे. तसेच जयवंती नदीमध्ये होणारे अवैध बांधकाम तात्काळ रोखुन संबंधित बांधकाम करणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच न.प. कार्यालयाचे स्वच्छता निरीक्षक श्री.वेडे यांची सुध्दा चौकशी करून त्यास सदर पदावरुन कमी करून इतर कर्मचारी त्या ठिकाणी नेमण्यात यावा. अन्यथा दलित महासंघच्या वतीने दिनांक २६.०१.२०२५ रोजी आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदक बापूसाहेब उदार (बीड जिल्हाध्यक्ष, दलित महासंघ, बीड) यांनी दिला आहे.




निवासी मतिमंद विद्यालय, पांगरी रोड बीड येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदुहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी शालेय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




## धारूर एस टि बस स्थानकात स्वच्छता अभियान कर्मचाऱ्यांचा उत्साहात सहभाग

धारूर / प्रतिनिधि

धारूर एस टी आगाराचे वतीने हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंती निमित्त २३ जानेवारी २०२५ रोजी किल्ले धारूर आगार व बस स्थानक येथे रा प धारूर आगाराचे आगार प्रमुख नवनाथ चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबवण्यात आली सर्व परीसर स्वच्छ करण्यात आला या वेळी प्रशासकीय यांत्रिक चालक वाहक कर्मचारी व पत्रकार यांनी स्वच्छता मोहिमे त उत्साहाने सहभागी झाले होते या वेळी आगारप्रमुख नवनाथ चौरे, लेखाकार नडगिरे वरिष्ठ लिपिक बिक्कड, नागरगोजे व इमरान कादरी सिद्धार्थ वाघमारे श्रीनिवास घोळवे विलास शिंदे रामदास नेहरकर आदी सह कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# महाराष्ट्राला एनर्जी ड्रिंक्सच्या विळख्यातून वाचवा!

मुंबई : महाराष्ट्र शासनाने ड्रग्ज मुक्त महाराष्ट्र मोहीम हाती घेतली आहे. ही मोहीम सुरू असूनही किराणा माल आणि शाळा कॉलेजच्या आसपास असलेल्या दुकानात कमी किंमतीत उपलब्ध होणारे एनर्जी ड्रिंक हे एखाद्या ड्रग एवढेच घातक आहे. त्यामुळे शाळा कॉलेजच्या आसपास कॅफेनयुक्त थंड पेयांच्या विक्रीवर बंदी घालावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्याकडे केली आहे.

जाहिरातींचे अनुकरण करून तरुण वर्गात दिवसेंदिवस एनर्जी ड्रिंकच्या नावाखाली कॅफेनयुक्त थंड पेय सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. या पेयामुळे आरोग्याला मोठा धोका निर्माण होत आहे. शाळा परिसरात एनर्जी ड्रिंकची सहज विक्री असल्याने शाळेतील मुलांना सहज उपलब्ध होत आहे. तरुण वर्गासोबतच लहान मुले देखील याकडे आकर्षित होत आहेत. शाळा व महाविद्यालय परिसरात कॅफेनयुक्त पेय (एनर्जी ड्रिंक्स) सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे आमदार सत्यजीत तांबे यांनी सांगितले. एनर्जी ड्रिंक्स १८ वर्षाखालील मुलांनी सेवन करू नये असे लिहिण्यात आलेले असते. मात्र विक्रेते याकडे साफ दुर्लक्ष करून सरसकट या वयातील मुलांनाही एनर्जी ड्रिंक्सची विक्री करतात.




- एनर्जी ड्रिंक्समधील कॅफेन शरीराला घातक
- कॅफेनचे जास्त सेवन केल्यामुळे नशा येऊन मेंदू, किडणी, मज्जारज्जू यावर विपरीत परिणाम होतो.
- अस्वस्थता, निद्रानाश, प्रजनन समस्या, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा आणि चिडचिडेपणा या व्याधींचा धोका निर्माण होतो.

## महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचे उद्धव ठाकरेंचे संकेत

मुंबई : आपली तयारी झाली असं दिसेल त्यावेळी कार्यकर्त्यांच्या इच्छेनुसार निर्णय घेणार, असं सांगत उद्धव ठाकरे यांनी आगामी महापालिका निवडणूक स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांनी रणशिंग फुंकलंय. शिवसैनिकांना तयारी करण्याचे आदेश दिले आहेत. महापालिका निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांच्या इच्छेप्रमाणे निर्णय घेणार असं सांगत त्यांनी स्वबळाचे संकेत दिले.

मराठी माणसाच्या नादी लागू नका : "तुम्ही भ्रमात राहू नका. मराठी माणसाच्या नादाला लागू नका. जिथे औरंगजेबाला झुकवलं तिकडे अमित शाह किस झाड की पत्ती," असं म्हणत उद्धव ठाकरेंनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांना टोला लगावला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात उद्धव



ठाकरे बोलत होते.


अमित शाहांवर हल्लाबोल : दोन महिन्यांपूर्वी निवडणुकांचा जो काही निकाल लागला, मला तो पटलेला नाही, असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं. "तसंच मधे अब्दाली येऊन गेले, कोण तुम्हाला माहीत आहे अमित शाह. त्यांनी सांगितलं की महाराष्ट्रातला विजय उद्धव ठाकरेंना जागा दाखवणारा आहे. जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा काय असतो ते तुम्हाला भविष्यात दिसेल," असं म्हणत उद्धव ठाकरेंनी अमित शाह यांना उत्तर दिलं.

मी माझं पक्षप्रमुख पद सोडणार : "ज्यादिवशी माझा निष्ठावंत शिवसैनिक म्हणेल की उद्धव तू बाळासाहेबांचे विचार सोडले आहेत त्याक्षणी मी माझं पक्षप्रमुख पद सोडल्याशिवाय राहणार नाही. हार-जीत होत असते. पण मूळात हा विजय भाजपाच्या अनेक लोकांना पचलेला नाही. काहीतरी गडबड घोटाळा नक्की आहे, ईव्हीएमचा तर नक्कीच आहे. ज्या अमित शाह यांनी संपूर्ण सरकारी यंत्रणा वापरुन अडीच वर्षे घटनाबाह्य सरकार लादलं ते असातसा महाराष्ट्र सुटू देतील?" असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला.

## धार्मिक स्थळांवर लाऊडस्पीकरचा वापर गरजेचा नाही

मुंबई : कोणत्याही धार्मिक स्थळांमध्ये लाऊडस्पीकरचा वापर गरजेचा नाही. त्यामुळं त्याच्या वापराविरोधात तक्रार आल्यास पोलिसांनी दखल घ्यावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत.

न्यायालयाने काय दिले निर्देश? : न्यायालयाचा हा महत्वपूर्ण निर्णय मानला जात आहे.




लाऊडस्पीकर आवाजाविरोधात तक्रार आल्यास दखल घेऊन प्रथम समज द्यावी, दुसऱ्यांदा उल्लंघन केल्यास लाऊडस्पीकर जप्त करावे, असे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. लाऊडस्पीकरचा वापर कोणत्याही धार्मिक कार्यक्रमात आवश्यक नाही. त्यामुळं अशा तक्रारींविरोधात नॉईज पोल्युशन अ‍ॅक्ट 2000 अन्वये प्रभावी कारवाई करावी, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत.ध्वनी प्रदूषण धोक्याचं : मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अजय गडकरी व न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणी दरम्यान हे निर्देश दिले. मुंबई कॉस्मोपॉलिटन शहर आहे, विविध धर्माचे नागरिक या ठिकाणी राहतात. ध्वनी प्रदूषण हा मोठा आरोग्याचा मुद्दा झालाय. लाऊडस्पीकरच्या वापरामुळं त्रास होता कामा नाही, याकडं न्यायालयानं लक्ष वेधले.

## वाल्मिक कराड रुग्णालयात दाखल

# जामीन अर्ज घेतला मागे

बीड, दि. २३ जानेवारी मस्साजोगचे :सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा आणि वाल्मिक कराडांच्या खंडणीचा संबंध असल्याप्रकरणी १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत असलेल्या वाल्मीक कराडने जामिनासाठी केलेला अर्ज मागे घेतला आहे. वाल्मीक प्रकरणात कराडच्या केलेल्या खंडणी जामीन याचिकेवर आज सुनावणी होणार होती. मात्र जामीन अर्ज मागे घेतल्यामुळे ही सुनावणी होऊ शकलेली नाही. दरम्यान बुधवारी रात्री वाल्मीकला रुग्णालयात दाखल करण्यात आले. आज अचानक जामीन अर्ज ही मागे घेण्यात आला. या संपूर्ण प्रकरणात तपास यंत्रणेकडून चार्जशीट दाखल केल्यानंतर पुन्हा एकदा जामीन अर्ज दाखल करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान वाल्मीक कराड याला बुधवारी रात्री अस्वस्थ वाटू लागल्याने जिल्हा



सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. सरकारी रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये वाल्मीक कराडवर उपचार सुरू आहेत. वाल्मिक कराडची सोनोग्राफी करण्यात आली. मधुमेह तसेच रक्तदाबाची तपासणीही बुधवारी रात्री करण्यात आली होती. पावणे बाराच्या सुमारास वाल्मिक कराडला बीडच्या कारागृहातून बाहेर काढण्यात आलं आणि रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्यावर उपचार सुरु आहेत.मकोका अंतर्गत वाल्मिक कराडला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याने किमान १८० दिवस वाल्मिक कराडला जामीन मिळू शकत नाही. दरम्यान न्यायालयीन कोठडी सुनावल्यानंतर वाल्मिक कराडचे वकील जामिनासाठी कोर्टात गेले होते. पण मकोका अंतर्गत कारवाईत १८० दिवस आरोपीला जामीन मिळत नाही. त्यामुळे आता पुढचे ६ महिने कराडला जेलमध्येच राहावं लागणार आहे.

## जिल्ह्यात चौदा हजार दोनशे जात वैधता प्रमाणपत्र वितरित

### इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसह विविध लाभार्थ्यांना दिलासा

**बीड (प्रतिनिधी)**

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्ह्यातील इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसह विविध लाभार्थ्यांना जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, बीड यांचेमार्फ़त एप्रिल २०२४ ते डिसेंबर २०२४ अखेर तब्बल १४२०० वैधता प्रमाणपत्र निकाली काढण्यात आले. जिल्ह्यातील अनु. जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासप्रवर्ग व एस. ई.बी.सी. प्रवर्गासाठी शैक्षणिक कामासह सरकारी कामांमध्ये, शासकीय योजनांकरता जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता असते. वैधता प्रमाणपत्रासाठी लागणारी कागदपत्रे व इतर बाबी वेळ खाऊ असतात. मात्र जात पडताळणी समितीमार्फ़त अशा चौदा हजार दोनशे लाभार्थ्यांना वैधता प्रमाणपत्र समितीमार्फ़त वितरित करण्यात आलेले आहेत.**

लाभार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन व ऑफ़लाईन आलेली कागदपत्रे तपासल्यानंतर त्यामधील त्रुटी असल्यास तसे कळवले जाते. त्यानंतर लाभार्थ्यांनी या त्रुटी पुर्तता केल्यानंतर जात वैधता प्रमाणपत्राच्या प्रस्तावाला तत्वत: मान्यता देऊन हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी समितीसमोर ठेवला जातो. समिती कागदपत्रांची पडताळणी करुन त्या प्रस्तावाला अंतिम मान्यता देते व त्यानुसार लाभार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र वितरित केले जाते.

तरी या कार्यालयात त्रुटी पुर्ततेअभावी आपला जातीदावा समितीकडून फेटाळण्यात आल्यास तसेच शैक्षणिक प्रवेशासाठी, निवडणूक, सेवेसाठी अपात्र ठरल्यास याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार व उमेदवारांची राहील. त्यामुळे समितीच्या वतीने विशेष अभियान दरम्यान कार्यालयीन वेळेत प्रमाणपत्र पडताळणी १०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत त्रुटी पुर्तता विशेष शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबीराचा जास्तीत जास्त अर्जदारांनी लाभ घ्यावा

# आत्मज्ञानाची शिकवण देणारा महान ग्रंथ श्रीमदभगवत गीता

### श्रीमद्भगवद्गीता विशेष :-परम पूज्य संत श्री आसारामजी बापू यांचा पावन संदेश

आजच्या अशांत मानवासाठी गीतेचे ज्ञान अत्यंत आवश्यक आहे गीता ज्ञान मानवाला योग्य दिशा दाखवते, त्याचे मनुष्यजन्माचे परम लक्ष ईश्वरप्राप्ती, याच जन्मात मुक्ती, आत्मशांती आणि अलौकिक आनंदाच्या प्राप्ती पर्यंत सहजतेने पोहोचवते . म्हणून मानव मात्राचे कल्याण इच्छिणाऱ्यांनी घरोघरी गीतेचे ज्ञान पोहोचवले पाहिजे. गीता उपनिषदातून निघालेले अमृत आहे, भगवान श्रीकृष्ण उपनिषद् रूपी गाईंचे दोहन करतात. वासरांच्या जागी अर्जुन आणि गोपाल अर्थात गवळ्यांच्या जागी भगवंत स्थीत आहेत. गीता एक असा विलक्षण ग्रंथ आहे जो संसाराच्या वावटळीत आसक्ती , द्वेष व युद्धाच्या मैदानातही अर्जुनाला अद्वैत तत्वाच्या प्रसादाचा अनुभव करून जीवनाची सायंकाळ होण्यापूर्वीच हृदयात जीवन दात्याचा अनुभव करून देतो . मृत्यू नंतर मुक्ती पाहिजे असेल तर श्रीमद् भागवताचे श्रवण करा परंतु जिवंतपणीच मुक्तीचा अनुभव करायचा असेल तर श्रीमद्भगवद्गीता आहे. सालोक्य मुक्ती, सायुज्य मुक्ती पाहिजे असेल तर श्रीमद् भागवताचेच श्रवण करा आणि कैवल्य मुक्ती व इतर चारही मुक्ती दासी बनवून शरणी पाहिजे असतील तर भगवान श्रीकृष्णांच्या अनुभवाचे अमृत भगवद्गीता आहे .तसेच ब्रह्मसूत्र, उपनिषद व वेदांतिक धर्म ज्ञानाने आत्म स्वरुपाचा साक्षात्कार करून घेतला पाहिजे असे भगवान सांगतात. गीता एक असा अलौकिक ग्रंथ आहे की अजूनही तो वृद्ध झाला नाही. सनातन धर्माचा गीता एक असा ग्रंथ आहे ज्याने जीवाला बरेच अधिकार दिले आहेत . भगवान श्रीकृष्ण ईश्वर असूनही त्यांनी जीवाला वर बसवले आहे स्वतः भगवंत सारथी बनले आहेत आणि अर्जुनाला रती बनवला आहे अर्जुन तर उपदेश ऐकल्यानंतर बोलतो हे अचुत तुमच्या कृपेने माझा मोह नष्ट झाला आणि मला आत्मज्ञान प्राप्त झाले आता मी नीसंशय होऊन तुमच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी स्थित आहे. आणि आमरण तुमच्या आज्ञेचे पालन करेन . परंतु भगवान तर अगोदर पासूनच म्हणतात अर्जुना मी तुझे वचन मानेन. अर्जुन म्हणतो दोन्ही सैन्यांच्या मध्ये माझा रथ घेऊन चला. जगात बरेच धर्म संप्रदाय पंथ आहेत परंतु कोणत्याही पंत संप्रदायाच्या भगवंताने जीवाला इतका मोठा अधिकार दिला असेल असे आजपर्यंत मी ऐकले नाही जीव स्वामींच्या जागी आणि ईश्वर सेवकाच्या जागी. माझा लाडका जेव्हा आज्ञा मानेल तेव्हा मानेल परंतु मी अगोदर पासूनच त्याची आज्ञा मानेल . या अति उदार स्वभावामुळे ईश्वर जीवाला म्हणतात तू आपल्या स्वरूपाला जाणून घे बघ तुझा महिमा किती अधिक आहे आतापासूनच मी तुझ्या आज्ञा मानतो, जेणेकरून तू सुद्धा माझी आज्ञा मानून आपले स्वरूप ओळखून घ्यावे. रामायणाचे भगवंत शबरीची उष्टी बोरे खाण्यात संकोच करत नाहीत आणि गीतेचे भगवंत अर्जुनाची घोडा गाडी चालवण्यात स्वतःला छोटा मानत नाहीत किती सरलता, किती भक्तवत्सलता किती करुणा आहे या भगवंताची. अशा अद्भुत दिव्य ग्रंथाला सोडून कशाला इतरत्र भटकायचे.

श्रीमद् भगवद्गीता विषयी महापुरुषांचे उद्गार .....

✻ गीता सर्व सुखांचा पाया आहे आणि सर्व विद्यांची मूळ भूमी आहे सर्वांसाठी उघडलेले परम धाम आहे.- संत ज्ञानेश्वर महाराज. ✻ गीता उपनिषदांमधून निवडलेल्या आध्यात्मिक सत्य आणि सुंदरतेच्या फुलांचा पुष्पगुच्छ आहे.- स्वामी विवेकानंद ✻ गीतेच्या आधारावर मनुष्य एकटा सर्व दुनियेचा मुकाबला करू शकतो.- आचार्य विनोबा भावे .✻ गीता आमच्या सर्व ग्रंथांमधून एक अत्यंत तेजस्वी आणि निर्मल हिरा आहे. - लोकमान्य टिळक. ✻ जीवनाच्या सर्वांगीक विकासासाठी गीता ग्रंथ अद्भुत आहे या ग्रंथामध्ये सर्व देश जातीपंताच्या मनुष्याच्या कल्याणाचे अलौकिक भंडार भरलेले आहे.- स्वामी श्री लीलाशहाजी महाराज. ✻ कुठल्याही जातीला उन्नतीच्या शिखरावर चढण्यासाठी गीतेचा उपदेश अद्वितीय आहे.- वारेन हेस्टिंग (ब्रिटिश शासनामध्ये भारताचे पहिले गव्हर्नर जनरल).हरिओम युवा सेवा संघटना परळी वैजनाथ.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT